**खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे,**

**साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालय, राजगुरुनगर**

**शैक्षणिक वर्ष 2022-23**

**अर्थशास्त्र विभाग**

महाविद्यालयाच्या कला शाखेतील अर्थशास्त्र विभागामध्ये शिक्षणा सोबतच विविध प्रकारचे उपक्रम राबविले जातात. शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ मध्ये अर्थशास्त्र विभागात प्रथम वर्ष कला या वर्गात १०३ विद्यार्थी, द्वितीय वर्ष कला या वर्गात ११ विद्यार्थी, तृतीय वर्ष कला या वर्गात १० विद्यार्थी असे एकूण १२४ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला. कला शाखेत विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या संधी सोबतच त्यांच्या कला गुणांना वाव देण्यासाठी इतर नावीन्यपूर्ण उपक्रम देखील घेण्यात आले.

प्रथम सत्रातील अंतर्गत मूल्यमापन १० ऑक्टोबर ते १५ ऑक्टोबर २०२२ या कालावधीत पूर्ण झाले. १० गुणांची Assignment. तसेच २० गुणांची लेखी परीक्षा घेऊन हे मूल्यमापन करण्यात आले.तसेच अर्थशास्त्र विभागात विद्यार्थ्यांची गुणवत्ता पडताळण्यासाठी सराव परीक्षा देखील घेतल्या जातात.

२६ नोव्हेंबर २०२२ रोजी राज्यशास्त्र विभागा अंतर्गत घेण्यात आलेल्या संविधान दिन - जनजागृती या विशेष उपक्रमा मध्ये अर्थशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त रीतीने सहभाग घेतला.

अशा रीतीने विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकास व्हावा व त्यांच्या कला गुणांना वाव देण्यासाठी अर्थशास्त्र विभाग नेहमीच प्रयत्न करत आला आहे.